म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ४२
सन १९२६



REFBK-0002578
REFBK-0002578

॥ आई न्यावें सुनेला प्रथमचि म्हणती मान्यही त्यास बाबा ॥
॥ न्यायें आहे तथापि तिजवरि तुमचा सर्वथा आज ताबा ॥

—केरळकोकिळ-एडिटरकृत—

# माहेरचें मूळ.

REFBK-0002578

REFBK-0002578

—प्रकाशक—

परचुरे, पुराणिक आणि मंडळी,

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स,

माधवबाग, मुंबई नं. ४.

आवृत्ति सहावी.

शके १८४८ ] किंमत दीड आणा [ जुलै १९२६.

या पुस्तकाचे सर्व प्रकारचे हक्क परचुरे, पुराणिक मंडळीनें
आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक—दिनकर सीताराम सांखळकर, लोकसेवक प्रेस,
खटाव बिल्डिंग, मुंबई नं. ४.

प्रकाशक—बळवंत विष्णु परचुरे, परचुरे पुराणिक आणि मंडळी,
बुकसेलर्स आणि पब्लिशर्स, माधवबाग-मुंबई नं. ४.

म. ग्रं. सं. ठाणे.

—केरळकोकिळ-एडिटरकृत—

# माहेरचें मूळ.

( स्त्रियांकरितां सुबोध व मार्मिक कविता. )

## श्लोक.

होती अंग धुवावयास बसली जों स्नून अंतःपुरीं
आला ओळखिचा तिच्या मधुरसा तों शब्द कानावरी ।
ओलें सोडुनियां निघे लगबगा आशा-तरू वाढला
दाराआडुनि पाहते तंव दिसे दादाच कीं आपुला ॥ १ ॥

झाले येउनियां जिला दिन बहू माहेरुनी सासरीं
डोळे लावुनि बैसली म्हणुनियां जी चातकाच्या परी ।
पाहोनी निज बंधु पूर चढला प्रेमाश्रुंचा लोचनीं
झाली सद्गद कामधाम तिजला कांहीं सुचेना मनीं ॥ २ ॥

भाऊ येउनि आंत हांसुनि पुसे ' आहेस बाळे ! बरी ?'
बोले ' होय ' हळूच सस्मित मुखें लाजोनि जाई दुरी ।
' भाऊ काय पितो चहा तव मुली ! ' सासूहि ऐसें वदे
' आलासे दमुनी तया झडकरीं कांहीं फराळास दे ॥ ३ ॥

‘ किल्लुचा घे फडताळ तूंच उघडीं लाडू चिरोटे वड्या ’
‘ चांदीच्या तबकांत ठेव भरुनी, दे भाकरी त्या गड्या ’।
‘ साधे सर्व तुला महा चतुर तूं जा पेटवीं लौकरी ’
‘स्टो’ का ‘फो’ नकळे तयावरि चहा सांजाहि ताजा करीं ॥४॥

पाणी पाय धुवावयास दिधलें वाढूनियां सत्वरी
प्रेमें येउनि बैसतां हरखली भाऊहि पाटावरी ।
कोणीना जवळी बघून पुसलें त्या वाढतांना दहीं
आई तात खुशाल बाळ बगडी आहेतना सर्वही ? ॥ ५ ॥

‘ चाले का तो दुडदुड अतां आपुला बाळ पायीं ’
‘ बाबा आई बगडि म्हणतां होतसे कोण घाई ’।
नाना बी. ए. नरहरि विनू जाहले काय पास ?’
‘ वैनीला ही ’ स्मितमुखि म्हणे ‘ ऐकिलें चार मास ’ ॥ ६ ॥

‘ बाळे ! ठीक खुशाल सर्व असती वाहूं नको काळजी ’
‘ झाले पास समस्त ईश्वरकृपें कामें मिळालीं दुजीं। ’
‘ आंबेहि पिकले गहूंहि विकले कांहीं नसे गे ! कमी ’
‘ इत्थंभूत घराकडील तुजला आहेच कीं बातमी ’ ॥ ७ ॥

‘ मामाजी म्हणतात घेउन चला मामीहि मोठ्या भल्या ’
‘ त्यांना त्या प्रतिकूल हें नच घडे दैवें तुला लाभल्या ’।
‘ वर्षानें यजमान काल तुमचे सुट्टींत आले घरीं ’
‘ धाडायास गमेल काय न कळे त्यांच्या परी अंतरीं ’॥ ८॥

'कामेंही नडिचीं घरीं जरि तरी आलों तुला न्यावया'
'आतां पाहुं कसा रुकार मिळतो सर्वां जनांचा तया'।
'मातें घेउन जा कसें तरि करीं जाऊं नको एकला'
'जाशी या उपरी तरी मग पहा ही आण माझी तुला' ॥९॥

'पाहूं या जुळतें कसें' म्हणुनियां तो जावयाला निघे
आले घेउनि मेहुणे तंव तिथें भेटीस दोघे तिघे।
गेली बोलत मंडळी तिजसवें भाऊहि माडी चढे
बाला तल्लिन जाहली दिसतसे माहेर डोळ्यांपुढें ॥ १० ॥

झाला हर्ष मनांत फार तिजला कांहीं निराशा परी
कीं आले पति आपुले फिरुनियां फारा दिसांनीं घरीं।
झालों तृप्त न दर्शनें उभयतां सेवा न झाली करें
नाहीं भाषण ऐकिलें मधुर तों जाणेंहि नाहीं बरें ॥ ११ ॥

मातृप्रेम खरेंच थोर पतिचें होतें परी झांकलें
ओढी लागुनि दोनिही मन जिचें दोहींकडे फांकलें।
चिंताग्रस्त तटस्थ जी क्षणभरी राहूनि चित्रापरी
आली शीघ्र पुन्हां विवेक करुनी ती देहभानावरी ॥ १२ ॥

सासू आली बघोनी झडकरि मग ती लागली कामकाजा
तीहीं बोले 'मुलांना प्रथम तरि मुली! जेवणें घाल जा जा'।
'भाज्या ताज्या चिरूनी खलुनि मग मला दे बघूं केशरातें'
'हाताखालीं सखूच्या त्वरित तुळशिला वाहुनी मीहि जातें'।१३।

होतां सारी तयारी झडकरि मुलगी ओळिनें पाट मांडी
चांदीचीं काढुनीयां धुउनि भरुनियां ठेविलीं नीट भांडीं ।
साऱ्या पीतांबरांच्या करुनि वरि निऱ्या ठेवि नेसावयाला
घेई कोशिंबिरी जी बहुविध चटण्या शीघ्र वाढावयाला ॥१४॥

आले नेसुनि सोंवळें समवयी दोघेहि ते मेहुणे
विद्यारूपगुणें निरालसपणें जे सारखे सद्गुणें ।
हौसेनें जंव इंग्रजा उभयतां बोलावया लागले
पाहोनी तंव दक्ष लक्ष पतिचें पत्नीकडे वेधलें ॥ १५ ॥

'नोहे ही गजगामिनी' मनिं म्हणे 'माझी प्रिया कामिनी'
'स्वर्गांतूनि खरोखरीच उतरे प्रत्यक्ष सौदामिनी'।
'मर्यादेस धरून वागत असे पाहोनि माझा कल'
'माहेरीं लिहिते प्रसन्नवदना पत्रें किती कोमल'॥ १६ ॥

'नाहीं ओळख धीर देउनि मना राहे तरी नांवरे'
'हाहा ! सुंदर मंदिरांत अमुच्या ही इंदिरा वावरे'।
'रत्नाचा असल्या वियोग मजला होणार थोडा तरी'
'साहूं राहुन एकटा तरि कसा हा काळजी अंतरीं'॥१७॥

भाऊ हांसुनि इंग्रजींतुनि पुसे, 'कां रावजी स्वस्थसे ?'
एकाकी सुचला विचार कसला वृत्ती न चित्तीं वसे'।
'छे ! छे ! नाहिं' म्हणे उगाच अपुलीं हीं लोणचीं रायतीं'
'आली पाहुन कल्पना सहज कीं मोजूं बरीं आयतीं'॥१८॥

२५५८

'वा ! वा ! राव अह्मास थाप दिधली खाशी भली चांगली'
'मोजायास्तव आज काय वरतीं आणून तीं टांगली ?'।
आले शब्द गळ्यांत उत्तर तया द्यायास कांहीं नुरे
'भाऊ माफ करा जरा' ह्मणति ते 'दुर्लक्ष झालें खरें'॥१९॥

ऐसा हास्य विनोद चालवुनियां ते एकमेकांप्रती
घ्या हो घ्या अति आग्रहास करुनी वाढावया लाविती।
मध्यें चोरुनि पाहती हळुच तों पत्नीकडे रावजी
प्रेमाचा सुचवी प्रसन्नवदना नेत्रांबुजें भाव जी ॥ २० ॥

आनंदांत मजेंत भोजन असें थाटांत झालें पुरें
आले आंचवुनी घरांत सगळे नेसावया धोतरें।
तों एका तबकांत कातरविडे खासे फुलांचे तुरे
ठेवी ती तरुणी पुढें बहुगुणी आणोनि मोठ्या त्वरें ॥२१ ॥

पाहोनी मुलिची कलाकुशलता सारे महा कौतुकें
माना डोलवुनी मनांत म्हणती 'केव्हां कधीं ही शिके'।
'रांगोळ्या कशिदा सुरेख झबलीं कुंच्या मुलांच्या करी'
'मामाजी म्हणतात अक्षर लिही ती शुद्ध मोत्यांपरी'२२॥॥

'आर्या श्लोक पदें स्वयें रचितसे सर्वांमधें पारखी'
'बोले मंजुळ फार फार विनयें प्रौढ स्त्रिये सारखी'।
'सर्वांशीं बहु गोड कोड पुरवी कोणा न दे दूषण'
'झाली भाउ ! खरोखरीच अमुच्या वंशास ही भूषण'॥२३॥

'सासू प्राणापरिच समजे सून तैशीच जाऊ'
'मामांजी तों म्हणाति इजला ठेउं कोठें न ठेऊं' ।
'वैनी वैनी करिति नणदा लोभ साऱ्या दिरांचा'
'लक्ष्मी झाली कळस' म्हणती 'आपुल्या मंदिराचा'॥२४॥

बोलोनी त्यां सुजनपण दे भाउ अन्य प्रकारें
'ज्याला त्याला निजसम जनीं वाटती लोक सारे'।
'तुम्ही सारे सुजन म्हणुनी होतसे तीहि मान्य'
'केलें आम्हां मुलिस पदरीं घेउनी धन्य धन्य' ॥२५॥

घालोनीयां वदनिं मग ती मंडळी तांबुलांस
गेली घेतां परिमळ करें बैठकीच्या स्थळास ।
कोणी पाहे वरिवरि बुकें चाळुनी वृक्ष पक्षी
कोणी कोणी हळु हळु करूं लागले वामकुक्षी ॥ २६ ॥

होतां होतां सकल इतुकें जाहले तास बारा
मागूनियां बहुत पडला बायकांचा पसारा ।
जेवायाचा तदुपरि गड्या-माणसांचा विचार
झाकापाकी सकल करितां वाजले तीनचार ॥ २७ ॥

लागे डोळा थकुनि पडतां सासुचाही जरासा
वाचायाला बघुनि मुलगी ग्रंथ येई बरासा ।
माहेरानें मन गुतविलें बंधु आला समक्ष
ऐशावेळीं क्षणभरि तिचें काय लागेल लक्ष ॥ २८ ॥

ग्रंथ काव्य ८२८

'लावूनि लक्ष जननी बसली असेल'
'जातां न मी मजवरी वहिनी रुसेल'।
'जावें क्षणांत उडुनी गमतें मनाला'
'नाहींत पंख मन काय करूं तयाला' ॥ २९ ॥

'आतां मना करिशि कां मज सांग घाई?'
'लग्नाक्षताच 'विसरे' ह्मणतात 'आई'।
'गज ह्मणे मुलिस तूं 'परकीय' 'ताशा'
'माहेरची धरिशि कां मग व्यर्थ आशा?' ॥ ३० ॥

'दावें धरून जिकडे वळवाल गाय'
'कां कूं कधीं न करितां तिकडेच जाय'।
'घालाल तेंच बहु गोड करून खाय'
'देतां दुधास न म्हणे परि रंकराय' ॥ ३१ ॥

'तैशी मुलीचीहि गरीब जात'
'देती जयाला तिकडेच जात'।
'श्रीमंत हो तो अथवा भिकारी'
'कीं अंध पंगू जड षड्विकारी' ॥ ३२ ॥

'जेऊं घाला सुरस अथवा जेवणावीण ठेवा'
'जाळा पोळा तरिहि करिते भक्तिन भर्तृसेवा'

'त्याच्या मागें करिति विधवा अन्न देती न पोटा'
'देवा देवा ! खचित मुलिचा जन्म हा फार खोटा !॥३३॥

'देवानें तर तोच जन्म मुलिचा मातें दिला भूवरी'
'ठेवोनी मग शब्द काय फळ तें होणार त्याच्यावरी'।
'त्याचा तो महिमा अगाध ह्मणती कैसा कळे आपणा'
'देवानें दिधल्या स्थितीस विटणें हा शुद्ध वेडेपणा'॥३४॥

'माझे तों पति सुस्वरूप शिकले ज्ञाते गुणी जाणते'
'सासू प्रेमळ सासरा धनपती आहे कमी कोणतें ?'।
'माझ्या नाखुषिला खरी तिळभरी जागा न ठेवी हरी'
'आतां निर्मळ वागणें जपुनि हें कर्तव्य माझ्या शिरीं'॥३५॥

'विश्वास ह्या सकल ईश्वर तात माता'
'सर्वांस तोच करुणार्णव बुद्धिदाता'।
'त्याची अगाध न कळे कवणास लीला'
'तो काय पार न करील मला मुलीला' ॥ ३६ ॥

'हरीच्या वरी सर्व माझा हवाला' !
'असे मान्य मी काय होईल त्याला'।
'विचारें अशा लोचनीं येत पाणी'
'पुराणांतलीं जाति वांगीं पुराणीं ॥ ३७ ॥

१०-६-२५

कठिण कठिण लोकीं फार हा मोहपाश
कितितरि मुनि झाले तोडतांना निराश ।
चिकटुनि बसती त्या साधुही जाड जाड
शिशुसम अबलेचा त्यांपुढें काय पाड ? ॥ ३८ ॥

ऐकावा तरि काय बेत ठरतो वाटे परी फार भी
धैर्यातें धरुनी जिन्यांत तरि ती जाऊनि राहे उभी ।
दोघांचा तंव चालला हळुहळू संवाद कानीं पडे
ऐके देउनि कान सर्व मन तें लावूनि त्याच्याकडे ॥ ३९ ॥

‘ बोला हो राव बोला झटपट करुनी काय तें स्पष्ट सांगा ’
‘ आणायाला गड्याला हळुहळु ह्मणजे सांगतों शीघ्र तांगा’ ।
‘ आई न्यावें सुनेला प्रथमचि ह्मणती मान्यही त्यास बाबा ’
‘न्यायें आहे तथापि तिजवर तुमचा सर्वथा आज ताबा’ ॥४०॥

‘ न्यायाचाही तराजू धरुनि निजकरें बोलतां फार नामी ’
‘भाऊ साहेब ! आहें जनकजननिच्या काय बाहेर हा मी !’ ।
‘ मामा तों वृद्ध मामी बहुबहु थकल्या भेटणेंही मुलांस ’
‘जाणें हें उक्त, यावें लवकर ह्मणजे प्रश्न झाला खलास’॥४१॥

ऐकोनी उत्तरातें सुखकर मुलिच्या हर्ष मावे न पोटीं
चित्तीं वाटे पतीची मधुरतर किती बोलण्याची हतोटी ।

आतां येथून जावें निघुनि पलिकडे स्वस्थ चित्तें निजावें
वाटावें बंधुला कीं खचित जणुं हिला नाहिं कांहींच ठावें ॥४२॥

'बाळे ! बाळे !' ह्मणोनी लगबग तंव तो भाउही येत मागें
घाई झाली अशी कीं वरुनि उतरतां त्याजला ठेंच लागे ।
मागें पाहे ' अगाई ' ह्मणुनि मग पुसे ' लागलें काय भारी ?'
'नाहीं नाहीं कशाचें झटपट कर जा आपुली तूं तयारी' ॥४३॥

तांगा आला ह्मणुनि समजें रात्रिची मेल साधूं '
'बांधाबांधी झटपट करीं लागतों मींहि बांधूं '।
'आणी पेटी उघडुनि डबा जा कशी आंत शीर '
'कोठें ही जा सतत अपुला बायकांना उशीर ' ॥ ४४ ॥

बोले 'दादा ! गडबड तुझी ही अशी काय फार '
'सासूबाई निजुन उठल्या त्यांस आधीं विचार ' ।
त्याही आल्या मुलिस ह्मणती ' जा तयारीस लागें '
'नाहीं कांहीं फिरुनि उरलें सांगणें तें मला गे ॥ ४५ ॥

'पाणी प्याया मधुन तुजला ह्या धरीं चार गोळ्या '
'घे त्या साड्या नविन शिवल्या पैठणी आणि चोळ्या' ।
'दादापाशीं कुलुप करुनी दे डबा दागिन्यांचा '
'जागा रात्रीं तिळभरि नसे नेम ह्या माणसांचा ' ॥ ४६ ॥

'थंडीलाही जवळ असुं दे नीटशी एक बंडी'
'आंब्याचीही भरुनि शिवुनि ठेविली ही करंडी'।
'पेढे बर्फी फणस चिवडा देइं साऱ्या मुलांतें'
'आईलाही खण भरजरी हा तुझ्या देइं हातें' ॥ ४७ ॥

तांगा आला बघुनि जलदी अक्षता कुंकुमांतें
लावोनीयां त्वरित पदरीं घातलें श्रीफलातें।
ऐशा प्रेमें करुनि भरुनी जाहली सर्व ओंटी
दादा 'बाळे' ह्मणति वरुनी 'ही तुझी सर्व खोटी' ॥ ४८ ॥

लक्ष्मी जाते पुरुष म्हणुनी पोंचवायास आले
'या या दादा।' म्हणुनि कितिदां तैं नमस्कार झाले।
सासू बोले 'बहुत पुसलें सांग आईस जातां'
'वाटेनें जा जपुनि, चढुनी बैस तांग्यांत आतां' ॥ ४९ ॥

सर्वांना ती नमन करितां बोलती 'अष्टपुत्रा'
'सौभाग्यें हो पतिसह करीं नीट संसारयात्रा'।
तांग्यामाजी बहिण बसली बंधु होताच आंत
'मीही येतों' म्हणुनि चढले रावही जात जात ॥ ५० ॥

काढोनीयां तिकिट फिरती तोंच गाडीहि आली
जागा खाशी बघुनि बसती तोंवरी शीट झाली।

जातां पाहे सजल पतिला चोरुनी लोचनानें
रावांनींही पथ सुधरिला खिन्न झाल्या मनानें ॥ ५१ ॥

'पाहोनी वाट आई करिल कितितरी आंत बाहेर खेपा
बाळें येतील ताई म्हणत मजवरी घालुनी कोण झेपा।
थट्टेनें लाजवीन प्रथम वहिनिला हेंच घोळे मनांत
खाडी टाकून गाडी घडघडघड तों पातली स्टेशनांत ॥ ५२ ॥

गली दारीं जंव तंव मुलें खेळती आंगणांत
ताई आली बघुनि पळती सांगण्याला घरांत।
दासी येई उतरुनि दहीं–भात टाकावयासी
हर्षें गेली चरण धुउनी आंत माहेरवासी ॥ ५३ ॥

आधीं केलें नमन वडिलां बोलती 'बैस खालीं'
कोणी कोणी 'बरिच' म्हणती 'जाउनी थोर झाली'
आईनें तों तिजसि पुसलें 'काय सारीं खुशाल !'
'आशिर्वादें कुशल तुमच्या' ती 'ह्मणे आज काल' ॥५४॥

'घे घे घे घे म्हणत जवळी बाळही शीघ्र आला
लागे 'ताई' म्हणुनि बगडी तेथ नाचावयाला।
पेढे बर्फी जमवुनि मुलें वांटली थोडथोडी।
चूंबूनीयां 'कितितरि' म्हणे 'लागते बाळ! गोडी' ॥५५॥

वाढी साजुक तूप तीस जननी भातास गोड दहीं
झाले जेवण खाण न्हाण बरवें हर्षोत्सवें सर्वही ।
प्रेमें फारच भेटली वहिनीला थट्टाहि झाली सुरू
लागे काम करावयास जरि ती बोले ‘ नका हो करूं’ ॥५६॥

झाल्या दोघी रिकाम्या उरकुनि अपुलीं कामकाजेंहि सर्व
आनंदाचें सुखाचें अनुपम गमलें फार दोघींस पर्व ।
गोष्टी दुःखासुखाच्या पळहि न कथितां ठेविती ज्या रिकामें
दावीती एकमेकीं वरचढ कशिदा काढलेलींहि कामें ॥ ५७ ॥

आई आली उठोनी हळुहळुच करूं लागली काडवाती
कन्या जावोनि तेथें निवडुनि बरवा घेत कापूस हातीं ।
लाडें लाडें म्हणे कीं ‘ उशिर करिशि कां पाठवायास दादा ’
‘बाळे ! होता तयाला तरिहि घडि घडी रोज माझा तगादा ५८ ’

‘ आई दाही दिशा ह्या तुजविण मजला खास होती उदास’
‘ बाबा दादा मुलेंही स्मरुनि गमतसे हा नको बंदिवास’।
‘ वाचोनी पत्र ताजें मधुर वहिनीचें हुंदका येत मोठा ’
‘वाटे ह्या बायकांचा खचित खचित कीं जन्म हा फार खोटा ’ ५९

‘ हा हा काय तुझा असा समजगे ! आहेस बाळे ! खुळी ’
‘ सृष्टीचा क्रम हा असाच असतो आश्चर्य नाहीं मुळीं ’ ।

‘ आतां त्वत्पतिला पगार चढुनि येईल गे संपदा ’
दासी दासहि भूषणें चढवुनी तल्लीन होशी सदा ’॥ ३० ॥

‘ दैवें होइल पुत्ररत्न बरवें कुरवाळितां त्या मुला ’
‘ कैंची बंधु बहीण आणि वहिनी भ्रांती असे ही तुला ’।
संसारीं मन एक वेळ शिरल्या माहेर होतें शिळें ’
‘ कोठेंही घन वर्षला तरि जगीं गंगेस गंगा मिळे ’ ॥ ६१ ॥

मराठी ग्रं... २५७८

समाप्त ।

REFBK-0002578
REFBK-0002578